**नियमित दिवाणी दावा क्र.२१/२०१५ मधील निशाणी क्र.५०
वरील आदेश.**

(दिनांक ०८/०६/२०२२ रोजी पारीत)

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिज्ञापत्रासह दिवाणी प्रक्रिया संहिता, ऑर्डर ६, रूल १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेकामी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादींनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करून अर्जास प्रखर हरकत घेतलेली आहे.

०३. वादीच्या वतीने युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी सदर दावा हा ठरावाकरीता व तुर्तातूर्त व निरंतर मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये वादी क्र.०२ या मयत झाल्या आहेत. वादी क्र.०२ यांना वादी क्र.०१, ०३ व ०४ हेच वारस असून ते दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामील आहेत. सबब, सदर दाव्याचेकामी केवळ वादी क्र.०२ या मयत असून त्यांचे वारस वादी क्र.०१, ०३ व ०४ हे असल्याबाबतची दुरुस्ती करणे आवश्यक आहेत. सबब, वादीने सदर दाव्याचेकामी वादी क्र.०२ यांचे नावापूढे मयत असे नमूद करणेची व वादी क्र.०१, ०३ व ०४ हे वारस आहेत असे नमूद करण्याची विनंती करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. प्रतिवादीने सदर अर्जाकामी त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत घेवून वादी क्र.०२ या दिनांक २३.०१.२०१९ रोजी मयत

झाल्या आहेत. सबब, विलंबाने अर्ज दिल्याचे कोणतेही कारण सदरहु अर्जामध्ये नमूद नसल्याचे कथन करुन अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

०६. वादी व प्रतिवादीतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. वादीने विलंबाने अर्ज दाखल करुन वादी क्र.०२ या मयत झालेबाबत व त्याचे वारस वादी क्र.०१, ०३ व ०४ हेच आहेत असे नमूद करून त्यानुसार दाव्यामध्ये दुरूस्ती करण्याची मागणी करीत आहे. वादी मागणी करत असल्याप्रमाणे दुरूस्ती ही वाद कथनाचे योग्य अवलोकन होण्यास मदत होणार आहे. वादी मागणी करत असलेल्या दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपामध्ये अथवा प्रतिवादीच्या बचावामध्ये कोणताही फरक पडणार नाही. वादी मागणी करत असलेल्या दुरूस्तीमुळे दोन्ही पक्षकारांतील वाद गुणदोषावर न्यायनिर्णय होणेस मदत होईल असे मला वाटते म्हणून मी, खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

:: **आ दे श** ::

०१. वादीचा अर्ज नि.क्र.५० मंजूर करण्यात येतो.

०२. वादीने पुढील तारीख अथवा तत्पुर्वी दाव्यामध्ये दुरूस्ती करून दुरूस्त दाव्याची प्रत विनाविलंब सादर करावी.

**स्वाक्षरी/-**

**ठिकाण : पाली.** **( मीना वा. जाधव)**
**दिनांक : ०८/०६/२०२२.** **दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाली.**